# अभिप्रायलेखन

'अभिप्राय' म्हणजे वाचलेल्या, बघितलेल्या किंवा अनुभवलेल्या गोष्टींबद्दल स्वत:ला काय वाटते याची सर्वसमावेशक अभिव्यक्ती होय. उदा. तुम्ही पुस्तके वाचता, चित्रप्रदर्शने बघता, चित्रपट पाहता, नाटकांचा आस्वाद घेता, वस्तुसंग्रहालयांना किंवा प्राणिसंग्रहालयांना भेट देता. या सर्वांबद्दल आपले स्वत:चे स्वतंत्र मत व्यक्त करणे म्हणजे **'अभिप्राय देणे'** होय.

अभिप्राय हा लिखित आणि मौखिक दोन्ही प्रकारचा असू शकतो; कधी हा अभिप्राय ती गोष्ट आवडल्याचा, पटल्याचा होकारार्थी, तर कधी नावडल्याचा, न पटल्याचा नकारार्थीसुद्धा असू शकतो. मात्र त्यामागील कार्यकारणभाव आपल्या शब्दांतून व्यक्त व्हायला हवा.

अभिप्राय व्यक्त करणे, ही उत्तम नैसर्गिक प्रवृत्ती असल्यामुळे त्या क्षमतेचा योग्य मार्गाने विकास झाला, तर आपल्या विचारांत स्पष्टता येते व त्याचा प्रभाव इतरांवर पडतो. समाजातील लोकांची मते आणि स्वत:ची मते यांचा तौलनिक (तुलनात्मक) अभ्यास करता येतो. काळानुरूप बदललेल्या गोष्टींचा तौलनिक दृष्टिकोनातून अभ्यास करता येतो. उदा. पूर्वीची नाटके आणि फिरते रंगमंच वापरून सादर केलेली आताची नाटके इत्यादी.

अभिप्रायलेखनामुळे एखाद्या गोष्टीचा सर्वांगाने विचार करण्याच्या क्षमतेचा विकास होऊन, आपली आकलनशक्ती भरपूर वाढते. त्याचबरोबर आपल्यातील समीक्षक हळूहळू जागा होतो.

**अभिप्रायलेखनाचे तंत्र :**

१. कलाकृतीचे नाव व तिचा अर्थ. (तिचे लेखक, चित्रकार किंवा दिग्दर्शक)

२. कलाकृतीचा आशय किंवा गाभा.

३. कलाकृतीचे सामाजिक महत्त्व व त्यातील मूल्ये.

४. कलाकृती आवडण्याचे अथवा नावडण्याचे कारण व त्याचे स्पष्टीकरण.

या व्यतिरिक्त तुम्ही एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण ठिकाणाला भेट दिल्यानंतर तुम्हाला काय वाटले, याविषयीचा अभिप्राय तुम्ही लिहू शकता.

१. प्रदर्शने – (चित्र, पुष्प, रांगोळी, विज्ञान, क्रीडा, साहित्य इत्यादी)

२. वाङ्मय – (पुस्तक, लेख, बातमी इत्यादी)

३. चित्रपट, नाट्यविषयाशी संबंधित.

४. संग्रहालयांसारखी ठिकाणे

## नमुन्यादाखल काही अभिप्राय

कृ.१. पुढील मुद्दे लक्षात घेऊन त्याखालील कृती सोडवा.




कृती- सदर प्रदर्शनास तुम्ही दिलेल्या भेटीचा अभिप्राय लिहा.

**उत्तर:** दि. २५ ऑक्टोबर २०१५ रोजी 'महाराष्ट्र व्यापारी पेठ' चे प्रदर्शन, दादर, डिसिल्वा हायस्कूलच्या मैदानात भरले होते. या प्रदर्शनात सर्व प्रकारच्या वस्तू, विविध प्रकारचे कृत्रिम दागिने, विविध प्रकारची नवनवीन घरगुती यंत्रे-साधने, विविध फॅशनेबल कपडे, खाण्याच्या नानाविध वस्तू, मुखशुद्धी पदार्थांचे अनेक प्रकार, विविध प्रकारच्या बॅगा, पर्सेस, पाकिटे, पुस्तके वगैरे विक्रीसाठी होते. प्रदर्शन सकाळी १० वाजल्यापासून ते रात्री १० वाजेपर्यंत असल्याने ते सर्वांच्याच सोयीचे झाले होते. प्रत्येक स्टॉलवर त्याच्या मालकाचे व तो ज्या भागातून आला त्या महाराष्ट्रातील विभागाचे नाव होते. प्रदर्शनात फक्त मोठ्यांचाच विचार न करता लहान मुलांचाही विचार करून त्यांच्यासाठी खेळण्यांचे स्टॉल्स लावले होते

प्रदर्शनाच्या एका कोपऱ्यात आकाशपाळणे, 'मेरी गो राउंड' यांसारखे विजेवर चालणारे खेळही मुलांसाठी होते. प्रदर्शनात लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांचीच करमणूक होत होती. या प्रदर्शनामुळे महाराष्ट्रातील विविध वस्तूंची, नवनवीन साधन-यंत्रांची

ओळख झाली, तसेच त्यांचा वापर कसा करावा हे त्यांनी दाखवलेल्या प्रात्यक्षिकांवरून कळले आणि त्यामुळे घरगुती साधन-यंत्रांकडे स्त्री-ग्राहक जास्त वळलेल्या दिसून येत होत्या. प्रत्येक खरेदी वस्तूवर कमीत कमी १०% सूट सर्व ग्राहकांना मिळत होती.

या प्रदर्शनात केलेल्या खरेदीवर ग्राहकांना आकर्षक भेट दिली जात होती. त्यामुळे जास्तीत जास्त ग्राहक या प्रदर्शनात खेचले जात होते.

**कृ.२. पुढील मुद्दे लक्षात घेऊन त्याखालील कृती सोडवा.**



**कृती- तुम्हाला आवडलेल्या पुस्तकाबद्दल अभिप्राय लिहा.**

**उत्तर:** पुस्तकाचे नाव – 'दोन ध्रुवांवर दोन पावलं'

लेखक / प्रकाशक – सुहास मंत्री

पृष्ठे – ८६

पुस्तकाचे मूल्य – ₹ २९०/-

**पुस्तकाची पार्श्वभूमी** – पर्यटनाला जायचं म्हणजे नेहमीची प्रसिद्ध ठिकाणेच डोळ्यांसमोर येतात. अंटार्क्टिका व आर्क्टिक ही नावे पर्यटनस्थळे म्हणून डोळ्यांसमोर येत नाहीत; पण तेथे प्रवासाला जाण्याचे धाडस बांधकाम व्यवसायात कार्यरत असणाऱ्या सुहास मंत्री यांनी केले. त्यांनी दोन्ही ध्रुवांची साहसी सफर यशस्वीपणे पूर्ण केली व त्याचे केलेले अनुभव कथन म्हणजे 'दोन ध्रुवांवर दोन पावलं' हे पुस्तक.

**पुस्तकाचा आशय** – अंटार्क्टिकाला जाताना विमानप्रवासाचा पहिला टप्पा पूर्ण केल्यावर, प्रत्यक्ष अंटार्क्टिकावर पाय ठेवताना कोणकोणत्या कठीण प्रसंगांमधून त्यांना जावे लागले आणि त्या संकटांवरही मात करून प्रत्यक्ष अंटार्क्टिकाचे लांबून दर्शन घेताना झालेली त्यांची मनोवस्था, इग्वाझू धबधब्याचे वर्णन, मार्टियन पर्वत, टँगो नृत्य यांविषयीचे अनुभव पुस्तकात वाचायला मिळतात. या पुस्तकातील पेंग्विन पक्ष्यांविषयीचे प्रकरण वाचकाला हळवं करून जाते. पुस्तकातल्या


हिमनग गल्लीचे वर्णन अविश्वसनीय वाटावे असेच आहे; परंतु त्याची सत्यता कळल्यावर आपल्याला याविषयीच्या कल्पनारंजनात बुडून जावेसे वाटते. पुस्तकातील हिमनगांची वर्णनेही निसर्गाच्या अजब किमयेची साक्ष पटवून देतात.

तर आर्क्टिकवरील ट्रॉम्सो गावातील नॉर्दन लाइट्सचा त्यांचा प्रत्यक्ष अनुभव त्यांच्याबरोबर आपल्यालाही स्तिमित करून टाकतो. सहा महिने रात्र व सहा महिने दिवस असताना, भर दुपारी हे गाव दिव्यांमध्ये कसे उजळून निघते, याचे लेखकाने केलेले मनोहारी वर्णन हृदयाला स्पर्श करून जाते.

**पुस्तकाचे सामाजिक मूल्य** – या दोन्ही ध्रुवांवरचे प्रवासवर्णन व अनुभव वाचताना लेखकाने या खंडांचा सखोल अभ्यासही केल्याचं लक्षात येतं, त्यामुळे हे पुस्तक वाचताना या दोन ध्रुवांविषयी अद्भुत माहितीही आपल्याला मिळते.

**पुस्तकाचा प्रभाव** – या साहसी प्रवासवर्णनाची ओघवती लेखनशैली, वाचताना अनेक ठिकाणी जाणवणारा लेखकाचा मिश्कील स्वभाव, त्याच्या जोडीला अप्रतिम छायाचित्रांमुळे हे प्रवासवर्णन अधिक वाचनीय झाले आहे. उत्तम छपाई-मांडणी, तिथल्या निसर्गाची मनोहरी छायाचित्रे या पुस्तकाचा एक महत्त्वाचा विशेष मानावा लागेल. प्रकाश बेग यांची छायाचित्रे या प्रवासवर्णनाला अधिक प्रभावी करतात.

**कृ.३. पुढील मुद्दे लक्षात घेऊन त्याखालील कृती सोडवा.**





**कृती- तुम्ही पाहिलेल्या चित्रप्रदर्शनावर अभिप्राय लिहा.**

**उत्तर:** चित्र काढणं ही जशी कला आहे, तशीच चित्रं पाहणं ही देखील एक कला आहे; म्हणूनच चित्रांची जाण अधिकाधिक वाढवून नवनवीन वैविध्यपूर्ण चित्रं मी आवर्जून पाहतो. नुकतेच जहांगीर आर्ट गॅलरीतील चित्रदालनात एक भव्य चित्र प्रदर्शन पाहिले. सुप्रसिद्ध

चित्रकार मंजित बावा व संभाजी कदम यांनी आपल्या रंगांची किमया या प्रदर्शनात मांडली होती. निसर्गचित्रांवर हुकूमत असलेले मंजित बावा यांची निसर्गचित्रे यात मांडली होती, तसेच काही व्यक्तिचित्रेही होती. तर खास व्यक्तिचित्रांसाठी प्रसिद्ध असलेले संभाजी कदम यांची अनेक गाजलेली चित्रे या प्रदर्शनात प्रेक्षकांना आकर्षित करत होती. या व्यतिरिक्त अमूर्त शैलीतील चित्रांचाही एक विभाग होता. तेथे काही नवख्या चित्रकारांची चित्रे मांडण्यात आली होती.

व्यक्तिचित्रांमध्ये संभाजी कदमांच्या कुंचल्याने मनावर भुरळ पडते. व्यक्तींची शारीरिक ठेवण, चेहऱ्यावरील भाव ते अप्रतिम रेखाटतात. रंगछटांमधून ते चेहरे जणू बोलायला लागतात! तर मंजित बावांची निसर्गचित्रे पाहावीत ती त्यातील गोंडस निसर्गरूपांसाठी. जलरंगांनी कॅनव्हासवर काय जादू साकारता येते, ते त्यांची चित्रे पाहून लक्षात येते. रंगांच्या आधारे निसर्गातील सर्व छटा टिपण्याचे कौशल्य त्यांच्यात आहे. या प्रदर्शनातील तिन्ही दालनांत चाहत्यांची संख्या लक्षणीय होती. अमूर्त चित्रांच्या दालनात तर जणू माणसं चित्रांतच हरवली होती. मलासुद्धा त्या चित्रांत बरंच काही गवसल्यासारखं वाटलं. दालनातून बाहेर पडलो खरा, पण त्या रंगविश्वाचे रंग काही नजरेसमोरून जाईनात. एक वेगळंच समाधान या अशा कला देतात. कलेइतकंच कलेला दाद देणंही महत्त्वाचं आहे.

**कृ.४. पुढील मुद्दे लक्षात घेऊन त्याखालील कृती सोडवा.**




**कृती- तुम्ही ऐकलेल्या संगीताच्या मैफिलीवर अभिप्राय लिहा.**

**उत्तर:** 'स्वरपुष्प' आयोजित संगीत मैफिलीत सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक राहुल देशपांडे व महेश काळे यांच्या स्वरांनी मंत्रमुग्ध होण्याची संधी मिळाली. 'कट्यार काळजात घुसली' या संगीत चित्रपटाच्या यशानंतर या दोघांनी एकित्रतपणे प्रत्यक्ष सादर केलेली ही पहिलीच मैफल होती. सोबत सुमारे १५-२० वादकांचा वाद्यवृंद होता.

मैफिलीच्या सुरुवातीला सुप्रसिद्ध गायक महेश काळे यांनी राग बागेश्री सादर केला आणि श्रोत्यांच्या अपेक्षा उंचावल्या. त्यानंतर त्यांनी भूप राग ज्याप्रकारे सादर केला, त्यामुळे श्रोत्यांच्या आनंदाला पारावर उरला नाही. मुळातच लवचीक असलेल्या सुरांवर जणू हुकूमत गाजवत अनेक सुरेख हरकती काळे यांनी घेतल्या. त्यानंतर सर्वजण ज्याची वाट पाहत होते, त्या 'कट्यार' मधील नाट्यपदांचे सादरीकरण सुरू झाले. 'सुरत पियाकी', 'अरुणी किरणी' या नाट्यपदांनी तर भान हरपले. नंतर राहुल देशपांडे यांनी स्वरसूत्रं आपल्या हाती घेतली. त्यांनी सादर केलेला यमन राग म्हणजे कानांसाठी मेजवानीच होती जणू. तर अभोगी राग सादर केला गेला तेव्हा श्रोतृवर्ग स्तिमित झाला होता. स्वरसाधनेची खरी अनुभूती तेव्हा आली. त्यानंतर राहुल यांनीही 'कट्यार' मधील 'दिल की तपीश', 'सुर से सजी', 'घेई छंद' ही नाट्यपदे सादर करून श्रोत्यांच्या काळजाचा ठाव घेतला. शेवटी त्यांनी 'हे सुरांनो' हे नाट्यपद गायले आणि त्यानंतर भैरवीच्या सुरांनी मैफल समाप्त झाली. मैफल संपली तरी राग, बंदिशी, कानात-मनात रुंजी घालत होते. नेहमीपेक्षा मैफल थोडी लांबली, तरी स्वरांच्या अप्रतिम, स्वर्गीय सादरीकरणामुळे त्याचे काही वाटेनासे झाले. भारावलेल्या, संगीतमय मनोवस्थेतच श्रोते समाधानी मुद्रेने परतले.


## सरावासाठी काही विषय

१. **पुढील मुद्दे लक्षात घेऊन त्याखालील कृती सोडवा.**

| | | |
|---|---|---|
| १५० कलाकारांचा सहभाग | दि. १० नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर, २०१५ | रांगोळ्यांचे प्रकार, वैविध्य, सूक्ष्म निरीक्षण |
| | **भव्य रांगोळी प्रदर्शन** | |
| प्रेक्षकांचा प्रतिसाद, कलाकारांशी संवाद | स्थळ: पु. ल. अकादमी, छोटा सभागृह, मुंबई | नेत्रसुखद, आल्हाददायक अनुभव |

**कृती- तुम्ही भेट दिलेल्या रांगोळी प्रदर्शनावर अभिप्राय लिहा.**

२. पुढील मुद्दे लक्षात घेऊन त्याखालील कृती सोडवा.




कृती- तुम्ही पाहिलेल्या विज्ञान प्रदर्शनावर अभिप्राय लिहा.

३. **पुढील मुद्दे लक्षात घेऊन त्याखालील कृती सोडवा.**




**कृती- तुम्हाला आवडलेल्या मराठी चित्रपटाबद्दल अभिप्राय लिहा.**

४. **पुढील मुद्दे लक्षात घेऊन त्याखालील कृती सोडवा.**




**कृती- तुम्हाला आवडलेल्या नाटकाबद्दल अभिप्राय लिहा.**